**L.C. BILL No. XIV OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, *NAGAR PANCHAYATS* AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

**सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १४ .**

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**( विधानपरिषदेने दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे. )**

**( विधानसभेने दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे. )**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१८८८ चा ३. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र
१९४९ चा ५९. महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,

१९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ रोजी मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२५, हा प्रख्यापित केला होता; १९६५ चा महा. ४०. २०२५ चा महा. अध्या. ११.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

प्रकरण दोन

## मुंबई महानगरपालिका अधिनियम याच्या सुधारणा.

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५ब ची सुधारणा. **२.** मुंबई महानगरपालिका अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश, "मुंबई महानगरपालिका अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ५ब मध्ये, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील :— १८८८ चा ३.

"परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा ; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, पालिका सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३७ ची सुधारणा. **३.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३७ मध्ये, पोट-कलम (२अ) मधील, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील :—

"परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, महापौर म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

प्रकरण तीन

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम याच्या सुधारणा.**

१९४९ चा ५९. **४.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश, "महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ५ब मध्ये, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील :— सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५ब ची सुधारणा.

"परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,-

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा ; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र,

सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, पालिका सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

**५.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १९ मध्ये, पोट-कलम (१ब) मधील, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील :— सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम १९ ची सुधारणा.

"परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र, सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची

निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, महापौर म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

प्रकरण चार

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या सुधारणा.**

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ९अ ची सुधारणा.

**६.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश, " नगरपरिषदा अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम ९अ मध्ये, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील :— १९६५ चा महा. ४०.

"परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा ; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र, सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, परिषद सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५१-१ब ची सुधारणा.

**७.** नगरपरिषदा अधिनियमाच्या कलम ५१-१ब मध्ये, विद्यमान परंतुकांऐवजी, पुढील परंतुके दाखल करण्यात येतील :—

"परंतु, जिने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकापूर्वी, तिच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला आहे, परंतु नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,—

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा ; आणि

(दोन) ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील असे हमीपत्र, सादर करील :

परंतु आणखी असे की, जर अशा व्यक्तीने, ती निवडून आल्याचे घोषित झाले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, अध्यक्ष म्हणून राहण्यास अपात्र ठरेल.".

सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ याचे निरसन व व्यावृत्ती.

**८.** (१) मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०२५, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०२५ चा महा. अध्या. ११.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुंबई
१८८८ महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर
चा ३. पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५, यांच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही
१९४९ कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह)
चा ५९. ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या संबद्ध अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात
१९६५ चा महा. ४०. आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला
आदेश असल्याचे मानण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १४.]**

**[ मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. एकनाथ शिंदे,**

उप मुख्यमंत्री (नगरविकास).**]**

**[ विधानपरिषदेने दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे. ]**

**[ विधानसभेने दिनांक १० डिसेंबर, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे. ]**

**जितेंद्र भोळे,**

सचिव (१),

महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.